# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १९३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## मंगळवार, दि. ०४ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११: ०० वा.



NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १९३ वी बैठक **मंगळवार, दि.०४ मार्च, २०२५ रोजी सकाळी ११:०० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अशोक उबाळे<br>विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>(मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**भावपूर्ण श्रध्दांजली:**

व्यवस्थापन परिषदेचे सदस्य तथा प्रस्तुत विद्यापीठाचे मा. प्र-कुलगुरु प्रा. (डॉ) लक्ष्मीकांत बसवराज दामा यांचे वडील कै. बसवराज भिमाशंकर दामा यांचे दि.०३/०३/२०२५ रोजी दुखःद निधन झाल्याने त्यांना सभागृहात भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा व श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी आपली अनुपस्थिती दूरध्वनीद्वारे कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | दि.१५ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठरावः | दि.१५ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १९२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | विषय क्र. ५ (१) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | अभियांत्रिकी विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | विद्यापीठ गेस्ट हाऊस संदर्भात सुधारित नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | विद्यापीठ गेस्ट हाऊस संदर्भात सुधारित नियमावली तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच खोलीमध्ये अधिकच्या प्रत्येक व्यक्तीच्या गादीसाठी जादा रुपये २००/- दर आकारणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. | |
| | विषय क्र. ५ (३) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | वित्त व लेखा विभाग |
| | पूर्वीचा ठराव | |
| | दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व प्रकाराच्या दरपत्रक / निविदा (Quotation / Tender) यांच्या मुदतीनंतर ३० दिवसाच्या आत कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व प्रकाराच्या दरपत्रक / निविदा (Quotation / Tender) यांची संपूर्ण अंतिम प्रक्रिया झाल्यानंतर ३० दिवसात कार्यारंभ / पुरवठा आदेश देण्यात येईल असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: अधिसभेची ३५ वी बैठक दि.११ मार्च, २०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता विद्यापीठ सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीची सूचना दि.२१ फेब्रुवारी, २०२५ रोजी सर्व सदस्यांना पाठविण्यात आली असून दि.०३ जुलै, २०२३ रोजीच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पत्रानुसार, अधिसभा सदस्यांनी बैठकीसाठी प्रश्न, प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख दि.२८/०२/२०२५ रोजी सायं. ०६:०० पर्यंत आहे. त्यानुसार अधिसभा सदस्यांनी अधिसभेच्या बैठकीकरिता पाठविलेल्या प्रश्नांची उत्तरे कार्यालयाकडून तयार करुन २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील नियम क्र. ६ (१३) नुसार, व्यवस्थापन परिषद अधिसभेच्या बैठकीत त्यांना द्यावयाची उत्तरे तयार करील.<br>सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अधिसभेच्या बैठकीत उत्तरे देण्याकरिता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव : | **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे निश्चित करण्यात आली व अधिसभेमध्ये या प्रश्नाची उत्तरे देण्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | **सन २०२४-२५ वर्षात “प्रेरणा” राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबीराच्या नियोजनाकरिता विद्यापीठ फंडातून तरतूद करण्याची बाब विचारार्थ.** | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |

टिपणी: सन २०२४-२५ मधील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत “प्रेरणा” राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिर महोत्सव कार्यक्रमाचे आयोजनाचे यजमानपद प्रस्तुत विद्यापीठाकडे देण्यात आले आहे. तसेच तारीख निश्चित करून “प्रेरणा” कार्यक्रम आयोजित करणेबाबत राष्ट्रीय सेवा योजना (मंत्रालय कक्ष), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी विद्यापीठास कळविले आहे.

सदर शिबीरासाठी महाराष्ट्रातून अंदाजे एकुण १७८ रासेयो स्वयंसेवक व संघव्यवस्थापक सहभागी होणार आहेत. “प्रेरणा” राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिर पाच दिवस आयोजनाकरिता शासनाकडून अंदाजे रक्कम रू.३,३७,३६८/- इतके अनुदान प्राप्त होणार आहे. “प्रेरणा” राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिराच्या पूर्व नियोजनासाठी विद्यापीठाचे संघव्यवस्थापक, विद्यापीठस्तरीय विविध समिती, समन्वयक व सदस्य असे मिळून अंदाजे २७५ प्रतिनिधी होत आहेत. त्याकरिता सदरच्या “प्रेरणा” शिबीराच्या आयोजनाकरिता सदरचे अनुदान हे अपुरे पडणार आहे. तरी सदरच्या “प्रेरणा” शिबीराच्या उत्तम आयोजनाकरिता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | नाव | संख्या | अंदाजे खर्च | अंदाजे एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | मंडप (सभामंडप व भोजन) (खुर्ची व मॅटींगसह) | ०१ | ५०,०००/- | ५०,०००/- |
| २ | चहा, नाष्टा व भोजन | २७५ | ३,६०,०००/- | ३,६०,०००/- |
| ३ | टी-शर्ट व टोपी | २०० | ५०,०००/- | ५०,०००/- |
| ४ | निवास ठिकाणी गादी व सतरंजी | २०० | ३०,०००/- | ३०,०००/- |
| ५ | सहभाग प्रमाणपत्र | २०० | ५०००/- | ५०००/- |
| ६ | व्हिडिओ शुटींग व फोटो अल्बम | - | २५,०००/- | २५,०००/- |
| ७ | निमंत्रण पत्रिका | १०० | ५०००/- | ५०००/- |
| ८ | बॅनर | ०५ | १०,०००/- | १०,०००/- |
| ९ | TA/DA व मानधन | - | ५०,०००/- | ५०,०००/- |
| १० | स्मृतिचिन्हे (सहभागी विद्यापीठ, प्रमुख पाहुणे व परिक्षक) | ६० | २५०००/- | २५०००/- |
| ११ | नियोजन बैठक | - | ५,०००/- | ५,०००/- |
| १२ | प्रमुख पाहुणे निवास भाडे | - | १०,०००/- | १०,०००/- |
| १३ | शाल व बुके | - | १०,०००/- | १०,०००/- |
| १४ | इतर किरकोळ | - | ५०००/- | ५०००/- |
| | | | अंदाजे एकुण रक्कम रू. | ६,४०,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | सबब, सदरच्या “प्रेरणा” शिबीराच्या आयोजनाकरिता वरील सर्व बाबीकरिता अंदाजे खर्च रक्कम रू. ६,४०,०००/- मधून शासनाकडून प्राप्त होणा-या अनुदान रक्कम रू.३,३७,३६८/- ही मार्च-२०२५ पूर्वी प्राप्त होणार असल्याने व त्यासाठी अंदाजपत्रकशिर्षक उपलब्ध नसल्याने Development Budget Part-I अंतर्गत State Level Prerana Camp जमा व खर्च बाजू उघडण्यास तसेच अंदाजे खर्च रु. ६,४०,०००/- मधून शासन अनुदान रु.३,३७,३६८/- वजा जाता उर्वरित रक्कम रू. ३,५०,०००/- विद्यापीठ फंडातून उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याकरिता राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत State Level Prerana Camp Expenses हे नवीन अंदाजपत्रक उघडून Foundation Day & Other Functions या अंदाजपत्रकीय शिर्षकामधून ६,४०,०००/- तात्पुरत्या स्वरुपात पुर्नविनियोजन उपलब्ध करुन घेण्यास व शासनाकडून प्राप्त होणारी रक्कम रू.३,३७,३६८/- विद्यापीठास जमा करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव : | सन २०२४-२५ वर्षात “प्रेरणा” राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिराच्या नियोजनाकरिता शासनाकडून येणारी रक्कम आणि विद्यापीठ फंडासह रु.४,५०,०००/- पर्यंत खर्च करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच कार्यक्रमाचे नियोजन व खर्च व्यवस्थित पार पाडण्यासाठी खालील समिती गठित करण्यात आली. | |

| अ. क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत,<br>मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य | अध्यक्ष |
| २. | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य |
| ३. | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ४. | डॉ. राजेंद्र कैलास वडजे | सदस्य-सचिव |

राष्ट्रीय सेवा योजना विभागाने “प्रेरणा” या नेतृत्व विकास शिबिराचे आर्थिक नियोजन व आयोजन करताना उपरोक्त समितीच्या मान्यतेनुसार करावे असे सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची प्रत्येक तीन वर्षातून एकदा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जाची तपासणी करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ (२) (ग) अन्वये १५ तज्ज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ नुसार संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जाची प्रत्येक तीन वर्षांतून किमान एकदा तपासणी करण्याची तरतूद नमूद आहे. प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित ४० अनुदानित महाविद्यालयांचे विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जाची (Academic and Administrative Audit-AAA) तपासणी शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये झालेली आहे. तद्नंतर ४० अनुदानित तर ४३ विनाअनुदानित महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाकरिताचे Academic and Administrative Audit (AAA) शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये झालेले असून सदरील Academic and Administrative Audit होऊन तीन वर्षे पूर्ण झालेली असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ नुसार संलग्नित महाविद्यालयांचे शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ करिताचे Academic and Administrative Audit (AAA) करुन घ्यावे लागणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ मधील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.<br>(१) प्रत्येक संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था, महाविद्यालयाचा किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा ठरवणे विद्यापीठाला शक्य व्हावे म्हणून विद्यापीठ निदेश देईल असे अहवाल, विवरणे व इतर तपशील सादर करील.<br>(२) प्र-कुलगुरु, त्याने त्याबाबतीत नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक विद्यापीठ विभागाची किंवा परिसंस्थेची, संलग्न महाविद्यालयाची किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेची, प्रत्येक तीन वर्षांतून किमान एकदा तपासणी करण्याची व्यवस्था करील आणि त्या समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल :-<br>(क) संबंधित विद्याशाखेचा अधिष्ठाता-अध्यक्ष;<br>(ख) विद्यापरिषदेकडून नामनिर्देशित करण्यात येईल अशी, विद्यापीठाशी अथवा त्याच्या अधिकारितेतील कोणत्याही संलग्न महाविद्यालयाशी किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेशी संबंधित नसलेली एक तज्ज्ञ व्यक्ती; | संलग्नता विभाग |

(ग) व्यवस्थापन परिषदेकडून नामनिर्देशित करण्यात यावयाची एक तज्ज्ञ व्यक्ती;

(घ) अधिसभेकडून नामनिर्देशित करण्यात यावयाची एक तज्ज्ञ व्यक्ती;

परंतु, अशा समितीवरील कोणताही सदस्य संबंधित महाविद्यालय किंवा परिसंस्थेच्या व्यवस्थापनाशी संबंधित नसेल.

(३) समिती आपला अहवाल प्र-कुलगुरुकडे, त्याच्या विचारार्थ आणि आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सादर करील.

उपरोक्त तरतूदीनुसार विद्यापीठाशी संलग्नित एकूण ११५ (४१ अनुदानित व ७४ विनाअनुदानित) महाविद्यालयांकरिता १५ तज्ज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन करावे लागणार आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची प्रत्येक तीन वर्षातून एकदा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जाची तपासणी करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ (२) (ग) अन्वये १५ तज्ज्ञ व्यक्तींचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.

ठराव : **प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांची प्रत्येक तीन वर्षातून एकदा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जाची तपासणी करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या समितीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११७ (२) (ग) अन्वये १५ तज्ज्ञ व्यक्तींचे खालीलप्रमाणे नामनिर्देशन करण्यात आले.**

| अ. क्र. | विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | |
|---|---|---|
| | अ. क्र. | सदस्यांचे नाव |
| १. | १. | **प्राचार्य डॉ. शंकर दत्तात्रय नवले**<br>एन.बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, सोलापूर. |
| २. | २. | **प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे**<br>एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोर्टी, ता. पंढरपूर, जि. सोलापूर. |
| ३. | ३. | **प्राचार्य डॉ. बभ्रुवाहन पांडुरंग रोंगे**<br>कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, गोपाळपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर. |
| ४. | ४. | **डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड**<br>श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर. |

| अ. क्र. | मानवविज्ञान विद्याशाखा | |
|---|---|---|
| | अ. क्र. | सदस्यांचे नाव |
| ५. | १. | **डॉ. दिपक चंद्रसेन ननवरे**<br>डी.ए.व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स,<br>सोलापूर. |
| ६. | २. | **डॉ. समाधान दिगंबर पवार**<br>श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी,<br>ता. बार्शी, जि. सोलापूर. |
| ७. | ३. | **डॉ. सुशिल कुमार शिंदे**<br>प्लॉट नं. २८, गट नं.११७,<br>शिंदे चौकाजवळ, इसबावी,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर. |
| ८. | ४. | **डॉ. नेताजी भारत कोकाटे**<br>विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय टेंभुर्णी,<br>ता. माढा, जि. सोलापूर. |
| अ. क्र. | वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | |
| | अ. क्र. | सदस्यांचे नाव |
| ९. | १. | **प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड**<br>उमा महाविद्यालय, पंढरपूर,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर. |
| १०. | २. | **डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला**<br>सोलापूर सोशल असोसिएशनचे,<br>आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, नवीन इमारत,<br>सैफी हॉस्पिटलच्या समोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर. |
| ११. | ३. | **डॉ प्राचार्य डॉ. सत्यजित कांतिलाल शाह**<br>हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स,<br>सेठ वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक,<br>सोलापूर. |
| १२. | ४. | **प्राचार्य डॉ. सुरेश रामचंद्र ढेरे**<br>लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय,<br>सोलापूर. |
| अ. क्र. | आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | |
| | अ. क्र. | सदस्यांचे नाव |
| १३. | १. | **डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज**<br>कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन,<br>सेठ वालचंद हिराचंद मार्ग, अशोक चौक, सोलापूर. |
| १४. | २. | **प्राचार्य डॉ. श्रीमती विद्युलता ज्ञानेश्वर पांढरे**<br>उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर,<br>ता. पंढरपूर, जि. सोलापूर. |
| १५. | ३. | **डॉ. विष्णू पांडुरंग शिखरे**<br>कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी,<br>ता. बार्शी, जि. सोलापूर. |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ५ ] | **शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्याकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या विवरणपत्रान्वये पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्ताराचे एकूण ६६ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.<br>उपरोक्त प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीनूसार अधिष्ठाता मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेस असणे आवश्यक आहे. यास्तव सदरील बाब दि. ११/०२/२०२५ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, त्यावर अधिष्ठाता मंडळाने ठराव क्र. ०५ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.<br>"शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी सदरची बाब व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली."<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरुन विहित कार्यवाही करुन पुढील कार्यवाहीस्तव विहित नमून्यात दरवर्षीप्रमाणे शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे १ एप्रिल किंवा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन, नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्याकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव : | **महाविद्यालयातील सदर अभ्यासक्रमांच्या लगतच्या वर्षाच्या (२०२४-२५) प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती व इतर संबंधित माहिती यासह सदरचा विषय पुनश्च: विचारार्थ अधिष्ठाता मंडळाकडे सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ६ ] | **दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १५ वर पारित झालेल्या ठरावानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारावरील लोखंडी कमान ऐवजी बांधकामाची भव्य कमान उभारण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १५ च्या अनुषंगाने अधिसभा सदस्य श्री. गणेश डोंगरे यांनी सध्या अस्तित्वात असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारावरील लोखंडी कमान ऐवजी बांधकामाची भव्य कमान उभारण्यात यावा असा प्रस्ताव मांडला होता.<br>सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास अधिसभा सदस्य ॲड. उषा नंदकुमार पवार यांची अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. असा ठराव पारित करण्यात आला आहे.<br>सबब, अधिसभेने केलेल्या शिफारशीनुसार सध्या अस्तित्वात असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारावरील लोखंडी कमान ऐवजी बांधकामाची भव्य कमान उभारण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव : | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारावरील लोखंडी कमान ऐवजी बांधकामाची भव्य कमान उभारण्यास दि.२४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ७ ] | **प्रस्तुत विद्यापीठाचे विद्यापीठ गीत हे संक्षिप्त करुन सुश्राव्य पध्दतीने नव्याने ध्वनीमुद्रीत करण्यात यावे अशी दि.२४/०९/२०२४ रोजीचा अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: दि. २४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभा बैठकीत प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी विषय क्र. १० अन्वये खालील प्रमाणे मांडला होत.<br>"प्रस्तुत विद्यापीठाचे विद्यापीठ गीत हे संक्षिप्त करुन सुश्राव्य पध्दतीने नव्याने ध्वनीमुद्रीत करण्यात यावे अशी शिफारसही अधिसभा परिषदेस करीत आहे."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाचे विद्यापीठ गीत हे संक्षिप्त करुन सुश्राव्य पध्दतीने नव्याने ध्वनीमुद्रीत करण्यात यावे अशी दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेने केलेली शिफारस विचारार्थ. | ललितकला व कला संकुल |
| ठराव : | **प्रस्तुत विद्यापीठाचे विद्यापीठ गीत हे संक्षिप्त करुन सुश्राव्य पध्दतीने नव्याने ध्वनीमुद्रीत करण्यात यावे अशी दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन मतितार्थ / शब्द न बदलता कमी वेळेत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [८(१)] | स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्रासाठी रु.२,००,०००/- इतक्या किंमतीची पुस्तके खरेदी करण्याची व अध्यासन केंद्र कृती समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्र |
| ठराव: | स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्रासाठी रु.२,००,०००/- इतक्या किंमतीची पुस्तके खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तथापि, अध्यासन केंद्र कृती समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतानुसार अभ्यास दौ-यासाठी बाहेर जाण्याचा ठराव सर्वानुमते नामंजूर करण्यात आला. | |

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## प्रश्नोत्तरे

### अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अजिंक्य तानाजी देशमुख | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे |
| | प्रश्न १ | विध्यापिठाच्या विविध प्राधिकरणावरील नियुक्त्या या standing कमिटीकडून झाल्या परंतु सिनेट वगळता BOS या प्राधिकरणाच्या नियुक्तीचे पत्र आजतागायत न देण्याचे कारण काय? [अभ्यासमंडळे विभाग] |
| | उत्तर | कार्यवाही सुरु आहे. |
| | प्रश्न: २ | विवध प्राधिकरणाच्या बैठकीत झालेले निर्णय बदलण्याचा अधिकार मा.कुलगुरु महोदयांना आहे का? [सभा व निवडणूका विभाग] |
| | उत्तर | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(६) अन्वये आहे. |
| २) | श्री. संजय नामदेव साळुंखे | डॉ. प्रशांत मारुती पवार |
| | प्रश्न: १ | विद्यापीठ परीक्षेसाठी विविध केंद्रावर बहिस्त वरिष्ठ पर्यवेक्षक नियुक्त करणे अनिवार्य आहे का? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | Uniform Ordinance No.८ मधील नियम क्र.४ अन्वये विद्यापीठाच्या परीक्षेसाठी विविध परीक्षा केंद्रावर बहिस्थ वरिष्ठ पर्यवेक्षक नियुक्त करणे अनिवार्य आहे. (सहपत्र ८) |
| ३) | ॲड. निता सुरेशबाबू मंकणी | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे |
| | प्रश्न: १ | OSM आणि non OSM प्रणालीतील निकाल अनुक्रमे किती दिवसांनी लागला? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | ऑक्टो/नोव्हें २०२४ ची निकाल प्रक्रिया सुरु आहे. |
| | प्रश्न: २ | विविध परीक्षांसाठी वापरण्यात येत असलेल्या उत्तर पत्रिकेवर कोडिंग केली आहे का? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | होय, बारकोड असल्यामूळे मॅन्युअली कोडींग केलेली नाही. |
| ४) | श्रीमती वर्षाराणी गिरीष कामूर्ती | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न: १ | पदवीदान समारंभ प्रसंगी महामहिम राज्यपाल यांना रिसिव्ह करण्यासंदर्भात कोणता प्रोटोकॉल आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | पदवीदान समारंभ प्रसंगी महामहिम राज्यपाल यांना मा. कुलगुरुमहोदय हे रिसिव्ह करतात असा प्रोटोकॉल आहे. |
| | प्रश्न: २ | मा. प्र.कुलगुरु यांच्या अधिकारातील विभाग कोणते? [मा. प्र-कुलगुरु कार्यालय] |
| | उत्तर | मा.प्र-कुलगुरु महोदय यांच्याकडे शैक्षणिक, संशोधन आणि विकास विभाग, अभ्यासमंडळे व विद्यापीठ परिसरातील सर्व संकुले इत्यादी विभाग आहेत. |

| | | |
|---|---|---|
| ५) | श्री. सुदर्शन मसु यादव | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न: १ | विध्यापिठाच्या विविध परीक्षेचे कामकाज पूर्ण करण्यासाठी कोणत्या सॉफ्टवेअरला काम दिले आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | संपूर्ण विद्यापीठासाठी IUMS या सॉफ्टवेअर प्रणाली अंतर्गत मे. एड्यूलॅब एज्युकेशन एक्सचेंज प्रा. लि., मुंबई यांना काम देण्यात आले आहे. |
| | प्रश्न: २ | आपले विध्यापिठ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ नुसार चालते का? [सभा व निवडणूका विभाग] |
| | उत्तर | होय. |
| ६) | श्रीमती रोहिणी आर. तडवळकर | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न: १ | विध्यापीठातील रसायनशास्त्र संकुलात एकूण किती कंत्राटी प्राध्यापक भरले आहेत? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | प्रस्तुत विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता १० कंत्राटी सहायक प्राध्यापक पदाची भरती प्रक्रिया करुन नियुक्ती करण्यात आले होते. त्यापैकी २ उमेदवार रुजू झालेले नाहीत. तर एका कंत्राटी सहायक प्राध्यापकाने राजीनामा दिल्याने त्यांना दि.०५/०२/२०२५ रोजी विद्यापीठ सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले आहे. |
| | प्रश्न: २ | मुलींच्या वसतिगृह अधिक्षक यांनी वसतिगृहात किती वेळ उपस्थित राहणे आवश्यक आहे? [मुलींचे वसतिगृह] |
| | उत्तर | प्रस्तुत विद्यापीठातील मुलींच्या वसतिगृहात अनुक्रमे श्वेता गावडे व सविता बनसोडे यांची गृहपाल म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून त्या सकाळी ११ ते ५ या वेळेत संकुलात व त्यानंतर त्या वसतिगृहात गृहपाल म्हणून उपस्थित असतात. अधिक्षक या कॅम्पसमध्ये राहत नसल्याने त्या बैठकीकरीता तसेच ज्यावेळी आवश्यकता असते त्यावेळी उपस्थित असतात. |
| ७) | श्री. अजितकुमार बापुराव संगवे | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न: १ | खेळाडूंना आखुड ब्लेझर शिवलेबाबत २४ सप्टेंबर २०२४ च्या अधिसभा बैठकीत प्रश्नोत्तराच्या तासात (प्रश्न क्र.२) गठित केलेली समिती नियुक्त न करता कुलगुरु महोदयांनी नवीन समिती गठित केली, हा अधिसभेचा अपमान नाही? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | दि.२४ सप्टेंबर, २०२४ च्या अधिसभेच्या कार्यवृत्तांतामध्ये कोणत्याही समितीचा उल्लेख नाही. तथापि, मा. प्र-कुलगुरु कार्यालयाने दि.२६/०९/२०२४ रोजी सादर केलेल्या कार्यालयीन टिपणीवर मा.कुलगुरु महोदयांनी पृष्ठांकन करुन सत्यशोधन समिती गठीत करण्यात आलेली आहे. |
| | प्रश्न: २ | प्रश्न क्र.१ संदर्भात कुलगुरु महोदयांनी नियुक्ती केलेल्या समितीच्या अहवालाची काय कार्यवाही केली? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | मा.कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या सत्यशोधन समितीचा अहवाल विद्यापीठास प्राप्त झाला असून, त्यावर प्रशासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | प्रश्न: ३ | खेळाडूंसाठी विद्यापीठाच्या नवीन वास्तुत उभारण्यात आलेल्या मल्टीपरपज हॉलला शासनाकडून व विद्यापीठाकडून किती निधी प्राप्त झाला व किती खर्च झाला? [अभियांत्रिकी विभाग] |
| | उत्तर | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, ४८२ एकर परिसरात खेलो इंडिया योजनेतंर्गत Multi-Purpose Sport Hall बांधकामाकरीता शासनाकडून व विद्यापीठाकडून प्राप्त निधी व झालेल्या खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे: |

| निधीची उपलब्धता | मंजूर | प्राप्त | खर्च |
|---|---|---|---|
| शासन | रु.४.५० कोटी | रु.२.२५ कोटी | रु.१२,९३,५७,७०१/- |
| विद्यापीठ फंड | रु.१४,४७,४२,७०५/- | --- | |
| एकूण | रु.१८,९७,४२,७०५/- | --- | रु.१२,९३,५७,७०१/- |

| | | |
|---|---|---|
| ८) | ॲड. मल्लिनाथ गुरुबसप्पा शहाबादे | डॉ. सुशिल कुमार शिंदे |
| | प्रश्न: १ | विविध समित्यावर काम केलेल्या तज्ञांचे मानधन कोणत्या तारखेपर्यंत आदा करण्यात आले आहे? [वित्त व लेखा विभाग] |
| | उत्तर | प्रस्तुत विद्यापीठामध्ये विविध समित्यावर काम केलेल्या तज्ञांचे मानधनाचे प्रस्ताव आदायगीसाठी या विभागास प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावाची पडताळणी करण्यात येते. त्यामध्ये काही त्रुटी निदर्शनास आल्यास त्याबाबत संबंधित विभागास कळविण्यात येते. सदर त्रुटींची पूर्तता करुन प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने देयके आदा करण्यासाठी यादी बनविणे, ऑनलाईन बँक प्रणालीमध्ये Entry करणे, देयके ऑनलाईन आदा करण्यास मान्यता घेणे इ. प्रक्रिया केल्यानंतर देयकाची रक्कम संबंधीत तज्ञांचे बँक खात्यामध्ये जमा होते. सदर प्रक्रिया ही निरंतर आहे. त्यामुळे प्रश्नात विचारलेली तज्ञांचे मानधनाची तारीख सांगता येणार नाही. |
| | प्रश्न: २ | पीएच डी मौखीक परीक्षेनंतर विध्यार्थ्यांना किती दिवसात नोटिफिकेशन देणे आवश्यक आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | १) University Grants Commission (Minimum Standards and Procedures for Award of Ph.D. Degree) Regulations, २०२२.<br>२) प्रस्तुत विद्यापीठाकडील Rules for Ph.D. Programme २०२३-२४ मध्ये पीएच. डी. मौखीक परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना किती दिवसात नोटिफीकेशन देण्यात यावे याबाबत कोणतीही तरतूद नाही. |
| ९) | श्री. धन्यकुमार जिनपाल बिराजदार | श्री. महादेव धरेप्पा कमळे |
| | प्रश्न: १ | विध्यापिठांतर्गत झालेल्या कर्मचार्यांच्या बदल्या ह्या कोणत्या निकष्यावर केलेल्या आहेत? [आस्थापना विभाग] |
| | उत्तर | विद्यापीठातंर्गत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या ह्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबनास प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार करण्यात आलेले आहेत. |
| | प्रश्न: २ | विद्यापीठाच्या विविध परीक्षाचे वेळापत्रक तयार करण्याची अंतिम जबाबदारी कोणाची? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १७(ड) व कलम ४८(झ) अन्वये परीक्षा व मूल्यमापन मंडळाची मान्यता मिळाल्यानंतर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ वेळापत्रक जाहीर करण्याची जबाबदारी राहील. |

| | | |
|---|---|---|
| १०) | श्री. सुरज ज्ञानोबा मस्के | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न: १ | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ कलम ४८(३) नुसार समिती गठीत केल्या आहेत का?<br>[परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | होय. |
| ११) | डॉ. राजेंद्र शंकर सुर्यवंशी | डॉ. समाधान दिगंबर पवार |
| | प्रश्न: १ | प्रस्तुत विद्यापीठ संकुलामध्ये एम. ए. मानसशास्त्र विषयासाठी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची नियमित प्रत्याक्षिके कोठे घेतली जातात? [सामाजिकशास्त्रे संकुल] |
| | उत्तर | प्रस्तुत विद्यापीठातील संकुलामध्ये एम. ए. मानसशास्त्र विषयासाठी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची नियमित प्रात्यक्षिके सामाजिकशास्त्रे संकुलात घेतली जातात. |
| | प्रश्न: २ | ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२४ प्रत्याक्षिक परीक्षेसाठी अभ्यासमंडळे विभागाकडून विद्यापीठ कायदा - २०१६ मधील परीणाम ४८(३) नुसार परीक्षकांच्या याद्या घेण्यात आल्या आहेत काय?<br>[परीक्षा व मूल्यमापन विभाग] |
| | उत्तर | १) परीक्षाकालीन विभागाच्या दि.१५/१०/२०२४ रोजीच्या परिपत्रक क्र.५२ अन्वये महाविद्यालय स्तरावर परीक्षकांच्या नेमणूका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ पोटकलम ४८(३) अन्वये परीक्षकांच्या यादीनुसार करण्यात यावे असे सर्व संलग्नित महाविद्यालये/संकुले यांना सोबत जोडलेल्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. (सहपत्र ९)<br>२) बी.एड., एम. एड., बी. पी.एड., एम. पी. एड. आणि बी. फार्मसी अभ्यासमंडळाचे प्रभारी अधिष्ठाता, प्रभारी सहयोगी अधिष्ठाता तसेच अध्यक्ष/सदस्य व समन्वयक यांच्या बैठका घेवून याद्या घेण्यात आल्या आहेत. |
| | प्रश्न: ३ | विद्यापीठाच्या बॅंक खात्यावर एनईफटी/आरटीजीएस/युपीआय ऑनलाईन पध्दतीने जमा केलेल्या किती रकमेचा अद्याप ताळमेळ लागलेला नाही? [वित्त व लेखा विभाग] |
| | उत्तर | विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांचे दि.०६/०६/२०१७ रोजीच्या पत्रानुसार सर्व प्रकारची जमा व प्रदाने ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत सुचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठामार्फत सर्व प्रकारचे फी ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.<br>यामध्ये अनेक विद्यार्थी/महाविद्यालये त्यांच्या फीची रक्कम विद्यापीठ खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करतात त्यानंतर पत्रावर संबंधीत विभागाकडून शेरा घेवून जमा रकमेची पावती करतात.<br>सन २०२१-२२ पासून अनेक महाविद्यालये / विद्यार्थी यांनी ऑनलाईन विद्यापीठ खात्यात पाठविलेल्या रकमेची पावती करुन घेण्यासाठी आलेले नाहीत. याबाबत विभागाने वेळोवेळी परिपत्रक निर्गमित करुन तसे सर्व संबंधितांना संपर्क करुन रकमेची पावती करुन घेणेबाबत कार्यवाही केलेली आहे. तथापि, यानुसार वर्षनिहाय ताळमेळ न झालेल्या रकमांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. |

| वर्ष | ताळमेळ प्रलंबित असलेल्या रक्कमेचा तपशील |
|---|---|
| २०२१-२२ | १,८४,६७०/- |
| २०२२-२३ | ६,५२,८४५/- |
| २०२३-२४ | ३,७१,१०३/- |
| २०२४-२५ | १६,८३,३४९.३६/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १२) | डॉ. भगवान नागनाथ आदटराव | | श्री. सचिन मारुती गायकवाड |
| | प्रश्न: १ | प्रस्तुत विद्यापीठ शिक्षक भरती २०२४-२५ मध्ये जाहिरातीत नसलेली किती पदे भरण्यात आली? [आस्थापना विभाग] | |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये जाहिरातीत नसलेली शिक्षकाची पदे भरण्यात आलेली नाहीत.** | |
| | प्रश्न: २ | प्रस्तुत विद्यापीठाच्या २०२५-२६ साठीच्या बृहत आराखड्यामध्ये विद्यापीठ संकुलासाठी किती नवीन कोर्सेस प्रस्तावित करण्यात आले आहेत? [संलग्नता विभाग] | |
| | उत्तर | **उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या २०२५-२६ च्या अल्पकालीन बृहत आराखड्यामध्ये विद्यापीठ परिसर संकुलात पदवी व पदविका १११ तर पदव्युत्तर पदवी आणि पदव्युत्तर पदविका ४४ असे एकूण १५५ नवीन कोर्सेस प्रस्तावित करण्यात आले होते.**<br>**तथापि, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.११/०७/२०२४ रोजीच्या पत्रानुसार सन २०२५-२६ च्या अल्पकालीन बृहत आराखड्यामध्ये नवीन स्थळबिंदूचा समावेश करण्यात येवू नये असे शासनाने आदेशीत केल्यामुळे विद्यापीठ परिसर संकुलात सन २०२५-२६ साठीचे ०५ कोर्सेस प्रस्तावित करण्यात आले आहेत.** | |
| | प्रश्न: ३ | प्रत्येक विषयासाठी संशोधन पध्दती भिन्न असताना सुध्दा पीएच.डी. कोर्स वर्क उत्तरपत्रिका तपासणी इतर विषयांच्या शिक्षकांकडून का करण्यात आली? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | **संशोधन पध्दती हा विषय सर्व विषयासाठी एकच आहे.** | |
| १३) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड |
| | प्रश्न: १ | ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२४ च्या विद्यापीठ परीक्षांमध्ये चुकीच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाकडून वितरित झाल्यामुळे विद्यार्थी, संघटनां, महाविद्यालये इत्यादिच्या किती तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | **ऑक्टोबर / नोव्हेंबर २०२४ च्या विद्यापीठ परीक्षांमध्ये चुकीच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाकडून वितरित झाल्यामुळे विद्यार्थी, संघटना, महाविद्यालये इत्यादिच्या १० तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत.** | |
| | प्रश्न: २ | प्रस्तुत विद्यापीठ शिक्षक भरती २०२४-२५ मध्ये नेट/सेट/पीएच.डी धारक पात्र उमेदवार उपलब्ध असताना अपात्र शिक्षकांच्या नियुक्ती का करण्यात आल्या? [आस्थापना विभाग] | |
| | उत्तर | **प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता** Walk-in-Interview **अंतर्गत कंत्राटी सहायक प्राध्यापक पदांची भरतीची प्रक्रिया महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०३ मधील तरतूदीनुसार गठीत निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे तसेच शासनाच्या प्रचलित आरक्षण धोरणानुसार कंत्राटी सहायक प्राध्यापकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.** | |
| | प्रश्न: ३ | प्रस्तुत विद्यापीठातील अध्यासन केंद्रांना निधी मंजूर असताना खर्च करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे काय? [पदार्थ विज्ञान संकुल, संगणकशास्त्र संकुल, सामजिकशास्त्रे संकुल] | |
| | उत्तर | **नाही.** | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४) | डॉ. श्रीमती सीमा अण्णासाहेब गायकवाड | | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे |
| | प्रश्न: १ | विद्यापीठ कायद्यानुसार बृहत आराखडा २०२५-२६ शासनास सादर करण्यापूर्वी विद्यापीठ कायद्यानुसार अधिसभेची मान्यता घेण्यात आली आहे काय? [संलग्नता विभाग] | |
| | उत्तर | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि.२४/०६/२०२४ रोजीच्या पत्रानुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना वार्षिक बृहत आराखडा सादर करणे संदर्भात शासनाने कालमर्यादा घालून दिल्यामुळे मा.कुलगुरुमहोदयांची मान्यता घेवून शासनास बृहत आराखडा सादर करण्यात आला तद्नंतर दि.२४/०९/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सदरचा विषय क्र.८ व ९ अन्वये सादर केला. | |
| | प्रश्न: २ | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ च्या विद्यापीठ परीक्षेच्या ऑन स्क्रीन इव्हॅल्युएशन बाबत विद्यापीठाकडे किती तक्रारी प्राप्त झाल्या आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | ऑन स्क्रीन इव्हॅल्युएशन बाबत विद्यापीठाकडे लेखी तक्रारी प्राप्त झाले नाहीत. तथापि, मूल्यांकनासंदर्भात येणाऱ्या अडचणीबाबत Whatsapp Group वरुन निराकरण केले जाते. | |
| | प्रश्न: ३ | विद्यापीठ स्थायी समिती बैठक दिनांक ०४/०९/२०२४ नुसार किती शिक्षकांना अभ्यास मंडळावरील नियुक्ती बाबतची पत्रे देण्यात आली आहेत? [अभ्यासमंडळे विभाग] | |
| | उत्तर | कार्यवाही सुरु आहे. | |
| १५) | प्रा. डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला | | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | प्रश्न: १ | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ विद्यापीठ परीक्षेमध्ये सर्व विद्याशाखांमधील किती प्रश्नपत्रिकांमध्ये एडूलॅब सॉफ्टवेअरच्या गोंधळामुळे तांत्रिक चुका आढळून आल्या? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ विद्यापीठ परीक्षेमध्ये एड्युलॅब सॉफ्टवेअरच्या झालेल्या चुकांच्या अनुषंगाने प्राप्त १० निवेदनांच्या अनुषंगाने उच्चस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आहे. सदर समितीचे कामकाज चालु आहे. | |
| | प्रश्न: २ | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ च्या विद्यापीठ परीक्षांमध्ये किती प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना वितरित करुन नंतर बदलण्यात आल्या? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२४ च्या विद्यापीठ परीक्षेमध्ये पश्नपत्रिकेमध्ये एड्युलॅब सॉफ्टवेअरच्या झालेल्या चुकांच्या अनुषंगाने प्राप्त १० निवेदनांच्या अनुषंगाने उच्चस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आहे. सदर समितीचे कामकाज चालू आहे. | |
| | प्रश्न: ३ | प्रस्तुत विद्यापीठात २०२४-२५ मध्ये पीएच.डी. आणि पदव्युत्तर प्रवेश परीक्षा ऑनलाईन पध्दतीने का घेण्यात आल्या? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | १) सन २०२४-२५ मध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेश परीक्षेबाबत मा.विद्यापरिषद, मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. व्यवस्थापन परिषदेमध्ये झालेल्या ठरावानुसार सदरच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आलेल्या आहेत.<br>२) प्रस्तुत विद्यापीठातील पदव्युत्तर प्रवेश परीक्षेच्या अनुषंगाने गठीत समितीच्या अहवालानुसार शै. वर्ष २०२४-२५ मध्ये पदव्युत्तर प्रवेश परीक्षा ही ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. | |
| १६) | ॲड. उषा नंदकुमार पवार | | डॉ. प्रशांत मारुती पवार |
| | प्रश्न: १ | विद्यापरिषदेच्या निर्णयानुसार n+२ बाधित विद्यार्थ्यांसाठी दुसरी विशेष संधी परीक्षा केव्हा घेण्यात येणार आहे? [परीक्षा व मूल्यमापन विभाग] | |
| | उत्तर | याबाबत योग्य त्या प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर लवकरच परीक्षा घेण्यात येतील. | |

प्रश्न: २ प्रस्तुत विद्यापीठाच्या अधिसभेने मंजूर केलेल्या विविध अध्यासन केंद्रांना कार्यान्वित करण्यासाठी विद्यापीठाने काय कार्यवाही केली आहे? [संगणकशास्त्र संकुल]

उत्तर
१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासन केंद्र कार्यान्वित करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली.
२) सदर समितीची बैठक आयोजित करुन बैठकीत झालेल्या इतिवृत्तांतानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

१७) श्री. सिध्देश्वर बाबु स्वामी — डॉ. सुशिल कुमार शिंदे

प्रश्न: १ मार्च २०२२, २०२३ व २०२४ च्या विद्यापीठ परीक्षेची सर्व मार्कलिस्ट व ॲडऑन कोर्स सर्टिफिकेट्स विद्यापीठाकडून वितरित झाली आहेत काय? [परीक्षा व मूल्यमापन विभाग]

उत्तर मार्च २०२२, २०२३ पर्यंतची सर्व मार्कलिस्ट महाविद्यालये व संकुलांना वितरीत करण्यात आली आहेत. २०२४ चे मार्कलिस्ट वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच Add on Course चे प्रमाणपत्र ज्या महाविद्यालयांनी Add on Course चे मार्क दिलेले आहेत व प्रमाणपत्रांची मागणी केलेली आहे अशा महाविद्यालयांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आलेले आहेत.

प्रश्न: २ २०२४-२५ मध्ये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांपैकी किती महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य अथवा प्रभारी प्राचार्य यांच्या मान्यता घेतलेल्या नाहीत? [शिक्षक मान्यता विभाग]

उत्तर २०२४-२५ मध्ये प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांपैकी एकुण ३५ महाविद्यालयांनी नियमित प्राचार्य अथवा प्रभारी प्राचार्य यांच्या मान्यता घेतलेल्या नाहीत.

१८) डॉ. मंगेश मोहन वेदपाठक — श्री. महादेव धरेप्पा कमळे

प्रश्न: १ पी. एम. उषा योजना यातून प्राप्त झालेल्या शंभर कोटी पैकी किती रक्कम आज अखेर खर्च झालेली आहे? [पीएम-उषा विभाग]

उत्तर पीएम-उषा योजनेतून आजअखेर झालेल्या खर्चाबाबतची माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पीएम-उषा अंतर्गत घटक | खरेदी/उपक्रमानुसार झालेला खर्च | वित्त व लेखाकडून खर्ची टाकण्यात आलेली रक्कम |
|---|---|---|---|
| १) | न्यु कन्स्ट्रक्शन | निरंक | निरंक |
| २) | रेनोव्हेशन ॲन्ड अपग्रेडेशन | निरंक | निरंक |
| ३) | इक्युपमेंट | १५,५७,५३१/- | ५,४८,१८४/- |
| ४) | सॉफ्टकॉम्पोनंट | ९,११,२६०/- | ३,८१,७१८/- |
| | एकूण खर्च | २४,६८,७९१/- | ९,२९,९०२/- |

प्रश्न: २ विद्यापीठाच्या नवीन बांधलेल्या मुख्य प्रशासकीय इमारती मधून प्रशासकीय कामकाज कधीपासून सुरू होईल? [अभियांत्रिकी विभाग]

उत्तर विद्यापीठाच्या नवीन बांधलेल्या मुख्य प्रशासकीय इमारतीबाबत संबंधीत वास्तुविशारद तथा प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंट (PMC) यांचेकडून उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त होताच, सदर इमारतीमध्ये प्रशासकीय कामकाज करण्यात येईल.

१९) श्री. चनबसप्पा गुंडप्पा बंकुर — श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील

प्रश्न: १ हिवाळी सत्र परीक्षा पूर्ण झाल्या आहेत का? नसतील तर त्या कधीपर्यंत होणार आहेत? [परीक्षा व मूल्यमापन विभाग]

उत्तर पीएच. डी. कोर्सवर्क, बी. फार्मसी व एम. फार्मसी या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त सर्व अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्र परीक्षा दि.०९/०२/२०२५ रोजी पूर्ण झालेले आहेत. पीएच. डी. कोर्सवर्क मार्च महिन्यात तर बी.फार्मसी व एम. फार्मसी या अभ्यासक्रमांच्या परीक्षा एप्रिल महिन्यात घेण्यात येणार आहे.

***